दै. तरुण भारत दि. ९/८/२०१८




करुळ : येथील घाटरस्त्यात संरक्षक कठडा तोडून दरीत झुकलेला कंटेनर. उज्ज्वल नारकर

# मोठा अनर्थ घडता घडता टळला

## करुळ घाटात कंटेनर दरीत झुकला : चालकाचे प्राण वाचवले


महेश रावराणे

वैभववाडी


शनिवार, सकाळी साडेसहाची वेळ... ठिकाण – करुळ घाट, दाट धुक्यात हरवलेला रस्ता... काहीसा मोकळा श्वास घेत असतानाच एक चालक कंटेनर घेऊन गगनबावड्याहून घाटरस्त्याने वैभववाडीच्या दिशेने निघाला. पण, घाटरस्त्यातील एका धोकादायक वळणावर कंटेनरचा ब्रेक 'फेल' झाला अन् तो रस्त्याचा संरक्षक कठडा उद्ध्वस्त करीत खोल दरीत झुकला. कंटेनरची मागील बाजू कठड्यातील दगडात अडकली, तर केबिन दरीच्या मुखाशी हेलकावे खाऊ लागली. चालकाचे प्राण 'नशिबाच्या दोरी'वर आले. पण, त्याचे दैव बलवत्तर म्हणून एक कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी 'देवदूत' बनून आला व अर्धा तास मृत्यूशी झुंज देणाऱ्या त्या चालकाला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले.



चालक उदयवीर सिंह


कृपया पान ६ पहा ▶▶


### 'मृत्यू' अन् 'देवदूत'ही दिसला...



एखाद्या 'हॉलिवूड' चित्रपटाला शोभेल व डोळ्यांच्या अंगावर शहारे निर्माण करेल, असा 'लाईव्ह' थरारक प्रसंग शनिवारी सकाळीच करुळ घाटात सुरू होता. केवळ चालक उदयवीर सिंह यांचे दैव बलवत्तर म्हणून त्यांचे प्राण वाचले. त्यांना उघड्या डोळ्यांनी मृत्यूही दिसत होता व त्यानंतर त्यांचे प्राण वाचविणारा संदीप राठोड हा 'देवदूत' दिसला. घटनास्थळी पोहोचताच कोणत्याही मदतीची वाट न पाहता दरीमध्ये अर्धा तास मृत्यूशी झुंज देणाऱ्या चालकाला सुखरूपपणे बाहेर काढणाऱ्या संदीप राठोड या पोलीस कर्मचाऱ्याच्या धैर्य व साहसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मोठा अनर्थ घडता घडता टळला


▶▶ पान १ वरून


उदयवीर सिंह (५८, रा. मंटोलीराम हाथरस, उत्तरप्रदेश) असे कंटेनर चालकाचे, तर संदीप राठोड असे त्या 'जांबाज' पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. या घटनेनंतर उदयवीर सिंह हे प्रचंड मानसिक दडपणाखाली असून त्यांच्यावर वैभववाडी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, 'हिरो' कंपनीच्या दुचाकी कंटेनरद्वारे (एम. आर. ५५, एम. ५९४९) घेऊन चालक उदयवीर सिंह हे हरिद्वार येथून कोल्हापूरमार्गे कुडाळला जात होते. शुक्रवारी मध्यरात्री करुळ घाटात दाट धुके असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यामुळे त्यांनी गगनबावडा येथे राहणे पसंत केले. शनिवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास थोडेसे धुके कमी झाल्यानंतर उदयवीर सिंह हे कंटेनर घेऊन करुळ घाटमार्गे कुडाळच्या दिशेने रवाना झाले.

### 'ब्रेक फेल' झाला, अन्...

कंटेनर करुळ घाटातील एका तीव्र उताराच्या वळणावर आला ...



करुळ: अपघातग्रस्त कंटेनर सुरक्षित बाहेर काढताना घाटरस्त्यात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. उज्ज्वल नारकर

होती. त्यामुळे चालक उदयवीर सिंह हे कंटेनरच्या केबिनमध्येच अडकून पडले. त्यांची केबिनमधून बाहेर येण्याची धडपड सुरू होती. पण, पायाखाली खोल दरी असल्याने जीव वाचविण्यासाठी त्यांचे प्रयत्न अपुरे पडत होते.

### मृत्यूशी झुंज सुरू!

याच दरम्यान, घाटातून जाणारे वाहनधारकही घटनास्थळी स्तब्ध झाले. दरीत झुकलेल्या भल्या मोठ्या कंटेनरला धक्का लागू न देता ... केबिनमधून बाहेर काढणे ... तास उदयवीर यांची मृत्यूशी झुंज सुरू होती.

### घाटातील वाहनानेच पोलीस राठोड गाठले घटनास्थळ

दरम्यान, एका वाहनधारकाने करुळ पोलीस दूरक्षेत्रात या अपघाताची माहिती पोहोचवली. यावेळी तेथे तैनात असलेल्या पोलीस कॉन्स्टेबल संदीप राठोड यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून घाटातून जाणाऱ्या वाहनधारकाच्या मदतीने घटनास्थळ गाठले. त्यांनी अडकून पडलेल्या कंटेनरचालकाला धीर देत त्याला असलेल्या दोरीने राठोड यांनी लाकडी फळ्यांची शिडी तयार केली. त्यानंतर त्या शिडीची दोरी सुरक्षितरित्या बांधून त्या दोरीचे एक टोक राठोड यांनी कंटेनरचालक उदयवीर सिंह यांच्याकडे फेकले. त्या दोरीला उदयवीर यांनी घट्ट पकडल्यानंतर ते सुरक्षित बाहेर येतील, याचा अंदाज घेत राठोड व मदतकर्त्यांनी त्यांना केबिन बाहेर घेतले.

### अखेर, चालकाचे प्राण वाचले!

दोरीच्या सहाय्यानेच उदयवीर सिंह यांना दरीच्या कठड्यावरून सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले. मात्र, उदयवीर हे घडलेल्या अपघातामुळे प्रचंड मानसिक दडपणाखाली होते. तसेच त्यांच्या छातीला संरक्षक कठड्याची भिंत घासल्याने त्यांना किरकोळ दुखापत झाली होती. तात्काळ त्यांना उपचारासाठी वैभववाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वैभववाडी पोलीस निरीक्षक दत्तात्रय बाकारे यांनी घटनास्थळी जात अपघाताची माहिती घेतली. दरम्यान, सायंकाळी